



वर्ष–२० वे | अंक–६ वा | वार–रविवार | दि.१ नोव्हेंबर ते ८ नोव्हेंबर २०२६ | पाने–४ | पान क्र.–१

भारताच्या सार्वभौमत्वाच्या रक्षणासाठी सरदार पटेलासारखे युगपुरुष नेतृत्व उद्यास येते-डॉ.रविंद्र भोळे

पुण्यात राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त सरदार वल्लभभाई पटेल जयंती उत्साहात; विविध क्षेत्रांतील मान्यवरांना 'हिंदू रत्न पुरस्कार' प्रदान



पुणे प्रतिनिधी –भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांनी कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तियोगाच्या माध्यमातून राष्ट्राची समर्पित भावनेने सेवा केली. स्वातंत्र्योत्तर काळात देशातील ५६५ हून अधिक संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करून त्यांनी भारताच्या एकात्मतेचा भक्कम पाया घातला. हैदराबाद, जुनागढ यांसारख्या संस्थानांच्या विलीनीकरणासाठी त्यांनी प्रसंगी कठोर निर्णय घेतले. राष्ट्राच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण होतो, तेव्हा सरदार पटेलांसारखे युगपुरुष नेतृत्व उदयास येते, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक व प्रवचनकार डॉ. रवींद्र भोळे यांनी केले.पद्मश्री डॉ. मणीभाई मानवसेवा ट्रस्टच्या वतीने पुणे येथे राष्ट्रीय एकात्मता दिन, सरदार वल्लभभाई पटेल जयंती आणि 'सरदार वल्लभभाई पटेल हिंदू रत्न पुरस्कार' वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. भोळे बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती तथा राज्यमंत्री दर्जा प्राप्त रवींद्र साठे होते. अध्यक्षीय भाषणात साठे (पा.२ वर)

पोस्टकार्ड ते मोबाईल-संदेश तोच, पण संवेदनशीलता हरवली!

एकेकाळी पोस्टमनची वाट पाहण्यातही एक वेगळाच आनंद होता. घराच्या दारात पोस्टमन दिसला की मनात उत्सुकता निर्माण व्हायची. त्याच्या हातातील पोस्टकार्ड, आंतरदेशीय पत्र किंवा पाकिटातून कोणाचा संदेश आला असेल, याची ओढ लागलेली असायची. त्या छोट्याशा पोस्टकार्डवर लिहिलेले मोजके शब्दही मनाला भरभरून आनंद देत असत. आज काळ बदलला, तंत्रज्ञान बदलले आणि पोस्टकार्डाची जागा मोबाईलने घेतली. संदेश पोहोचण्याचा वेग वाढला; मात्र त्या संदेशातील भावनांची ऊब कुठेतरी कमी झाल्याची जाणीव होते.पूर्वी पोस्टकार्ड हे केवळ कागदाचे एक छोटेसे पान नव्हते, तर ते दोन मनांना जोडणारा भावनिक दुवा होते. दूरदेशी गेलेल्या मुलाचे आई-वडिलांना आलेले पत्र, माहेरी गेलेल्या मुलीने सासरी पाठविलेला निरोप, नोकरीसाठी गाव निवड करताना विचार करायचा. प्रत्येक (पा.२ वर)

आमदार अमोलभाऊ जावळे यांच्या पाठपुराव्याला यश; पीक विमा अर्जासाठी १५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

तांत्रिक अडचणींमुळे विम्यापासून वंचित राहणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा; अर्ज भरण्यास मिळाली अतिरिक्त संधी




रावेर । प्रतिनिधी–खरीप हंगाम २०२६ मधील पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणींची दखल घेत आमदार अमोल जावळे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. पीक विमा योजनेत अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ वरून आता १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. या निर्णयामुळे रावेर-यावल तालुक्यासह राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.यंदा अपुऱ्या पावसामुळे राज्यातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना पीक विम्याचे संरक्षण मिळणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, डिजिटल क्रॉप सर्व्हे (ऊडड) प्रणालीतील तांत्रिक अडचणी, गावांच्या नकाशांमधील त्रुटी, पीक पाहणीच्या नोंदी उपलब्ध नसणे तसेच सातबारा उताऱ्यावरील माहिती आणि ऑनलाइन प्रणालीतील तफावत यामुळे अनेक शेतकऱ्यांना पीक विम्याचे अर्ज भरताना अडचणींचा सामना करावा लागत होता.पीक विमा अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ निश्चित करण्यात आली होती. मात्र, तांत्रिक अडचणींमुळे अनेक पात्र शेतकरी अर्ज दाखल करू शकले नव्हते.

त्यामुळे त्यांना पीक विमा योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागण्याची शक्यता निर्माण झाली होती.ही बाब गांभीर्याने लक्षात घेऊन आमदार अमोल जावळे यांनी २२ ऑक्टोबर रोजी कृषी विभागाच्या प्रधान सचिवांकडे निवेदन सादर केले होते. त्यामध्ये पीक विमा योजनेची मुदत वाढविण्यासह डिजिटल पीक पाहणी प्रक्रियेलाही मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली होती.आमदार जावळे यांनी शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत पीक विमा अर्ज भरण्यासाठी १५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे अर्ज भरताना तांत्रिक अडचणींचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना आता आणखी एक संधी उपलब्ध झाली आहे.शेतकऱ्यांनी मुदतीपूर्वी अर्ज भरावेतपीक विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी वाढीव मुदतीचा लाभ घेत १५ नोव्हेंबर २०२६ पूर्वी आपले अर्ज भरून घ्यावेत, असे आवाहन करण्यात येत आहे.

विठ्ठलभक्तीचा आर्त स्वर आणि काव्यात्म भावविश्व!

शैलेश शिवाजीराव गायकवाड यांच्या 'विठ्ठला, तुजविण कसा राहू?' या काव्यसंग्रहाचा साहित्यिक वेध



भक्ती ही केवळ देवाच्या चरणी नतमस्तक होण्याची भावना नाही, तर ती माणसाच्या अंतर्मनातील श्रद्धा, प्रेम, समर्पण आणि आत्मसंवादाचा एक सुंदर आविष्कार आहे. भक्त आणि भगवंत यांच्यातील नाते शब्दांच्या पलीकडचे असते. कधी ते प्रार्थनेतून व्यक्त होते, कधी विरहाच्या अश्रूंमधून, तर कधी देवाशी केलेल्या लडिवाळ संवादातून. वारकरी संप्रदायाच्या समृद्ध परंपरेत या भक्तिभावाला अभंग, ओवी आणि कीर्तनाच्या माध्यमातून अभिव्यक्ती मिळाली. याच संतपरंपरेतील भावविश्वाचा धागा पकडत कवी शैलेश शिवाजीराव गायकवाड यांनी 'विठ्ठला, तुजविण कसा राहू?' हा काव्यसंग्रह वाचकांसमोर आणला आहे.या संग्रहाचे शीर्षकच वाचकाला भक्तीच्या अंतःकरणातील व्याकुळतेची जाणीव करून देते.

विठ्ठलाशिवाय जीवन अपूर्ण असल्याची भावना, त्याच्या दर्शनाची ओढ आणि त्याच्याशी मनमोकळेपणाने संवाद साधण्याची इच्छा या संग्रहातील कवितांमधून सातत्याने व्यक्त होते. कवीच्या मनातील विठ्ठल हा केवळ मंदिरातील देव नसून सुख-दुःखाचा साक्षीदार, मनातील वेदना जाणणारा सखा आणि जीवनप्रवासातील आधार आहे.(पान नं.३ वर)

दिवाळीच्या दिव्यांआड बळीराजाची व्यथा;जळगांव जिल्हयातील शेती संकटाच्या छायेत!-जितेंद्र कुलकर्णी

केळीच्या बागा, कपाशीची शेते आणि रब्बी हंगामाच्या आशा... दुष्काळाच्या झळांनी शेतकऱ्यांच्या सणासुदीच्या आनंदावर विरजणदिवाळी म्हटली की डोळ्यांसमोर उभे राहते ते उजळलेले अंगण, दारातली रांगोळी, आकाशकंदील, पणत्यांचा लखलखाट, फराळाचा सुगंध आणि कुटुंबाच्या चेहऱ्यावरील आनंद. मात्र, जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण भागात या उत्साहामागे शेतकऱ्यांच्या मनातील चिंता सहजासहजी लपून राहत नाही. कारण बळीराजासाठी दिवाळीचा आनंद हा केवळ सणापुरता मर्यादित नसतो; तो त्याच्या शेतातील पिकांशी, मिळणाऱ्या उत्पन्नाशी आणि वर्षभराच्या आर्थिक गणिताशी जोडलेला असतो. शेतात हिरवाई नसेल, पिकांना अपेक्षित उत्पादन मिळणार नसेल आणि बाजारात मालाला योग्य भाव मिळण्याची खात्री नसेल, तर घरात दिवे लावूनही मनातील काळजी दूर होत नाही.जळगाव जिल्हा म्हटला की सर्वप्रथम आठवते ती केळीची समृद्ध शेती. तापी नदीचे खोरे, काळी कसदार जमीन आणि अनेक भागांतील केळी उत्पादनामुळे जिल्ह्याला कृषी क्षेत्रात स्वतंत्र ओळख मिळाली आहे. केळीबरोबरच कपाशी, मका, ज्वारी, बाजरी, सोयाबीन, तूर, मूग, उडीद आणि इतर पिकेही जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या अर्थकारणाचा महत्त्वाचा भाग आहेत. मात्र, पावसाची अनिश्चितता, (पा.नं.२ वर)

गोदावरी फांऊडेशनच्या विविध संस्थांमध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांना अभिवादन

राष्ट्रीय एकता दिनानिमित्त विविध महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यक्रमांचे आयोजन

जळगाव । प्रतिनिधी गोदावरी फाउंडेशन संचालित विविध शैक्षणिक व वैद्यकीय संस्थांमध्ये भारताचे लोहपुरुष, भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त तसेच राष्ट्रीय एकता दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात माजी खासदार डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी विद्यार्थी विभागप्रमुख अनंत इंगळे, भूषण चौधरी, पंकज राणे, मिलिंद पाटील, नरेंद्र नारखेडे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.(पान.२ वर)









लेवा शुभमंगलतर्फे १० नोव्हेंबरला भुसावळ येथे दिवाळी स्पेशल वधू-वर मेळावा

लोकाग्रहास्तव सावदा–फैजपूरेवजी भुसावळ येथे आयोजन; ५ हजारांहून अधिक विवाहस्थळांची माहिती ॲपवर उपलब्ध

भुसावळ : लेवा समाजातील विवाहेच्छुक वधू-वरांना योग्य जोडीदार निवडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे, तसेच विवाहविषयक विविध माहिती एकाच ठिकाणी मिळावी, या उद्देशाने लेवा शुभमंगलतर्फे दिवाळी स्पेशल वधू-वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा मंगळवार, दि. १० नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० ते दुपारी २.३० या वेळेत कमल गणपती हॉल व लॉन, शांतिनगर, भुसावळ येथे होणार आहे.सदर मेळावा यापूर्वी सावदा-फैजपूर येथे आयोजित करण्याचे नियोजन होते. मात्र, लोकाग्रहास्तव आणि समाजबांधवांच्या सोयीचा विचार करून मेळाव्याचे ठिकाण बदलून भुसावळ येथे निश्चित करण्यात आले आहे.वधू-वरांच्या विवाह जुळविण्याच्या दृष्टीने विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आले असून समाजातील विवाहेच्छुक युवक-युवती आणि त्यांच्या पालकांना एकमेकांशी संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. या मेळाव्याचा जास्तीत जास्त समाजबांधवांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.दरम्यान, लेवा शुभमंगलचे मोबाईल ॲप नावनोंदणीसाठी उपलब्ध असून या ॲपवर पाच हजारांहून अधिक विवाहस्थळांची माहिती उपलब्ध आहे. इच्छुकांनी ॲप डाउनलोड करून नावनोंदणी करावी. तसेच विवाहविषयक माहिती व आगामी मेळाव्याच्या नियोजनासाठी लेवा शुभमंगलच्या व्हॉट्सॲप चॅनेलला जोडावे, असेही कळविण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी लेवा शुभमंगल कार्यालयाशी ८०१०४९१६३५, ९४२०३०९९६५ किंवा श्री. हर्षल मंगला सुभाष जावळे (८२७५०८४००१) यांच्याशी संपर्क साधावा.

